# चेन्नई येथे राष्ट्रीय महोत्सवात प्रगती महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची सुवर्ण कामगिरी



कु. तन्मय संतोष म्हात्रे.
प्रगती कला व वाणिज्य महाविद्यालय, डोंबिवली

३९ व्या असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीज (AIU) आंतर - विद्यापीठ राष्ट्रीय युवा महोत्सव (UNIFEST) २०२५-२०२६, मार्च २०२६ मध्ये चेन्नई येथे सत्यभामा इन्स्टिटयूट ऑफ सायन्स अँड टेकनॉलॉजी येथे संपन्न झाला. या महोत्सवात देशातील १४१ विद्यापीठे सहभागी झाली होती. या राष्ट्रीय युवा महोत्सवात मुंबई विद्यापीठाच्या पथकाने सुवर्ण कामगिरी केली. या महोत्सवात विद्यापीठाच्या पथकात ठाणे जिल्हा आगरी शिक्षण प्रसारक मंडळाचे, प्रगती कला व वाणिज्य महाविद्यालय, डोंबिवली (पूर्व) येथील एम. ए. (अर्थशास्त्र) विभागातील विद्यार्थी कु. तन्मय संतोष म्हात्रे याने नेत्रदिपक यश संपादन केले. पथनाट्य, मूकाभिनय, लोक-वाद्यवृंद आणि सांस्कृतिक शोभायात्रा या स्पर्धांमध्ये ४ सुवर्ण पदके मिळवली. मुंबई विद्यापीठाच्या या नेत्रदिपक कामगिरी मध्ये कु. तन्मय संतोष म्हात्रे याने सहभागी होऊन यशस्वी कामगिरी केली. यामुळे पुन्हा एकदा प्रगती महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला. या उत्कृष्ट कामगिरी बद्दल ठाणे जिल्हा आगरी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष माननीय श्री. जगन्नाथजी पाटील साहेब तसेच संस्थेचे विश्वस्त मंडळ व नियामक मंडळ यांचे सर्व पदाधिकारी, कार्यकारी मंडाळाचे सर्व सभासद आणि महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. धनंजय वानखडे, उप प्राचार्या डॉ. कीर्ती बारड तसेच सांस्कृतिक विभागाच्या प्रमुख रुपाली देवळेकर व सांस्कृतिक विभागाचे सर्व सदस्य यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.